

| वर्ष - 6 | अंक - 313 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- अनुसूचित जाती घटकांसाठीच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी
- मोशीतील नक्षत्र आयलँड सोसायटीचा पाणी प्रश्न निकालात!
- भावी मुख्यमंत्री कोण?

www.mahaenews.com | मंगळवार दि. 28 फेब्रुवारी 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# अनधिकृत शाळांना 'कुलूप' कधी?

## »प्रशासनाची केवळ बघ्याची भूमिका: विद्यार्थी- पालकांच्या भावनांशी खेळ





।पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड महाराष्ट्र शासनाची कोणतीही परवानगी न घेता राजरोसपणे चालवल्या जाणाऱ्या शिक्षण संस्थांवर कधी कारवाई होणार? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. शिक्षण विभागाच्या वतीने दरवर्षी शाळा चालू झाल्यानंतर या शाळांना केवळ नोटीस बजावली जाते. मात्र अनधिकृत शाळांच्या वतीने या नोटीसला केराची टोपली दाखवली जाते. त्यानंतर मात्र वर्षभर या शाळा चालू राहतात व शिक्षण विभाग देखील पुढील शैक्षणिक वर्ष येईपर्यंत चिडीचूप राहतो. गेली अनेक वर्ष या शाळांवर ठोस अशी कारवाई होत नाही. त्यामुळे अशा बेकायदा शाळा कोणाच्या आशिर्वादाने सुरू आहेत, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडून शहरातील अनाधिकृत शाळांची यादी जाहीर करण्यात आली आहे. त्यामध्ये ज्ञानराज माध्यमिक शाळा (कासारवाडी), मॉडर्न पब्लिक स्कुल (रहाटणी, मास्टर केअर इंग्लिश स्कुल (भोसरी), ग्रँट मीरा इंग्लिश स्कूल (चिखली), एस. एस. स्कूल फॉर किड्स (सांगवी), साई स्कूल ऑफ एक्सलेन्स (पिंपळे सौदागर), सेंट रोझरी इंग्लिश मिडीयम स्कुल (चिखली), माने इंग्लिश स्कुल (राजवाडेनगर, काळेवाडी) यातील ६ शाळा बंद करण्यात आल्याचे शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले आहे. मात्र, काही शाळांमध्ये नवीन वर्षाची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे.

### कायदा काय सांगतो?

» महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या या ढिसाळ कारभारामुळे अनाधिकृत शाळांची मुजोरी दिवसेंदिवस वाढत चालली आहे. पालकांची आर्थिक लूट करणे, विद्यार्थी पालकांना त्रास देणे असे अनेक प्रकार या अनधिकृत शाळेमध्ये घडतात. शासन निर्णयानुसार बालकांचा मोफत मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क अधिनियम २००५ च्या कलम २८(५) नुसार १ लाख दंड आकारणी करण्याची तरतूद आहे व त्यांनतर देखील सदर शाळा बंद न केल्यास शासन निर्णयानुसार दर दिवशी १० हजार रुपये दंड मारण्याची व शाळा संचालकावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची तरतूद आहे.

### अधिकाऱ्यांची बोटचेपी भूमिका...




» महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडे कारवाई करण्याचे संपूर्ण अधिकार असताना शिक्षण अधिकारी अनधिकृत शाळांना कारवाई करायचे सोडून सूचना का करत आहेत हेच समजत नाही ? रयत विद्यार्थी विचार मंच संस्था दिनांक १२ ऑगस्ट २०२२२ पासून अनाधिकृत शाळेच्या विरोधात पत्रव्यवहार करत आहे. तसेच, दि. १९ ऑक्टोबर २०२२ रोजी एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात आले. यावेळी शिक्षण अधिकारी यांनी येऊन उपोषण सोडण्यास सांगितले व तात्काळ या शाळांवर कारवाई करणार असल्याचे आश्वासन दिले. पण, उपोषण करून ४ महिने होत आले कायदेशीर गुन्हा अथवा प्रति दिवस १० हजार रुपये दंड अशी कोणतीही कारवाई झाल्याचे दिसून येत नाही. शिक्षण विभाग आमच्या कोणत्याही पत्राला उत्तर देत नाही.

### ...अन्यथा पुन्हा उपोषण

» शिक्षण खाते अनधिकृत शाळांवर एवढी मेहरबानी का दाखवत आहे? असा प्रश्न आहे.गेल्या अनेक महिन्यापासून आम्ही शिक्षण उपसंचालकाकडे अनधिकृत शाळांवर करावी करण्याबाबत प्रस्ताव ठेवला आहे असे सांगून शिक्षणाधिकारी दिशाभूल करत आहेत का ? शिक्षण अधिकाऱ्यांना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भविष्याची चिंता वाटत नाही का ? अनाधिकृत शाळांमध्ये शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीला

### जबाबदार कोण ?

» कृपया आपण यावर तात्काळ लक्ष घालावे व कारवाई करावी. ८ दिवसात कारवाई न झाल्यास आम्ही परत याप्रकरणी अमर उपोषण करणार याची नोंद घ्यावी, असा इशारा रयत विद्यार्थी विचार मंचचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे आणि प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांनी दिला आहे.





# अनुसूचित जाती घटकांसाठीच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी

» मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची उपस्थिती

। पुणे । महाईन्यूज ।

राज्यासह देशातील अनुसूचित जाती घटकांसाठीच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी, जनजागृती, नियम आणि कायद्यांसह योजना तळागाळातील नागरिकांपर्यंत पाहोचवण्यासाठी पुण्यात विचारमंथन होणार आहे. त्यासाठी केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय आणि विशेषाधिकार मंत्रालय, राज्याच्या सामाजिक न्याय विभागातर्फे राष्ट्रीय कार्यशाळा मंगळवारी (२८ फेब्रुवारी) होणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय सामाजिक न्याय विभागाचे मंत्री वीरेंद्र कुमार,



राज्यमंत्री रामदास आठवले या कार्यशाळेला उपस्थित राहणार आहेत.

विविध राज्यांमध्ये अनुसूचित जातीच्या घटकांतील लोकांसाठी राबवल्या जाणाऱ्या योजनांची अंमलबजावणी, इतर राज्यांतील नव्या योजना, त्या संदर्भातील धोरणे तयार करणे, नियम आणि कायदे, केंद्र आणि राज्याच्या योजना नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठीच्या उपाययोजना या बाबत चर्चा करून एक मसुदा कार्यशाळेत तयार केला जाईल. कार्यशाळेत पंजाब, हरियाणा, जम्मू-काश्मीर, दिल्ली, राजस्थान ,मध्य प्रदेश, छत्तीसगड, गुजरात, महाराष्ट्र, दीव दमण, दादर नगर हवेली आणि गोवा असे १२ राज्यांचे सामाजिक न्याय विभागाचे मंत्री, मुख्य सचिव ,अतिरिक्त मुख्य सचिव, सचिव, आयुक्त, संचालक आदींचा सहभाग आहे. या कार्यशाळेसाठी राज्याच्या समाज कल्याण विभागाचे आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे यांची मुख्य समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे.

## भाजपा उमेदवार रासनेंनंतर मविआचे रवींद्र धंगेकर, राष्ट्रवादीच्या रुपाली ठोंबरे यांच्याविरुद्धही गुन्हा दाखल!

।कात्रज । महाईन्यूज । प्रतिनिधी।

कसबा पेठ विधानसभा मतदारसंघाती पोटनिवडणुकीतील भाजपाचे उमेदवार हेमंत रासने यांच्यासह काँग्रेसचे उमेदवार रवींद्र धंगेकर आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या उपाध्यक्षा रुपाली ठोंबरे यांच्याविरुद्ध आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी तक्रारी करण्यात आल्या. या तक्रारीची दखल घेत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी कारवाई सुरू केली आहे.

भाजपचे उमेदवार हेमंत रासने यांच्याविरोधात आचारसंहिता भंग केल्याचा अदखलपात्र गुन्हा विश्रामबाग पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. मतदानाच्या दिवशी रविवारी भाजपाचे उमेदवार हेमंत रासने हे मतदान केंद्रात भाजपाचे चिन्ह असलेली उपरणे गळ्यात घालून गेले होते. उपरणे घालूनच त्यांनी मतदान केले. याविरोधात राष्ट्रवादी काँग्रेसच्या रुपाली ठोंबरे यांनी निवडणूक निरीक्षकांकडे तक्रार केली होती. मतदान केंद्राच्या १०० मीटर आत कोणतेही पक्ष चिन्ह घेऊन त्यांचा मतदारांवर प्रभाव पडेल, अशी कृती करण्यास मज्जाव आहे. त्याचे उल्लंघन केल्याने हेमंत रासने यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





## भाजपचे गणेश बिडकर यांच्याविरुध्द अदखलपात्र गुन्हा

**पुणे** : कसबा पेठ विधानसभा पोटनिवडणुकीत पैसे वाटप केल्याच्या आरोपावरुन भाजपचे माजी नगरसेवक गणेश बिडकर यांच्यासह कार्यकर्त्यांविरुद्ध समर्थ पोलिस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल केला आहे. याबाबत युवक काँग्रेसचे कॅन्टोन्मेंट विभागाचे माजी अध्यक्ष फैयाज कासम शेख (वय ३८, रा. मंगळवार पेठ) यांनी समर्थ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरून बिडकर यांच्यासह मयूर चव्हाण, नईम शेख, बाला शेख यांच्याविरुद्ध अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे उद्यापासून आझाद मैदानावर ठिय्या आंदोलन

» अंगणवाडी कर्मचाऱ्यांना सरकारी कर्मचाऱ्यांचा दर्जा द्यावा, मानधनात वाढ करावी

।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

राज्यातील अंगणवाडी कर्मचारी मागील आठवडाभरापासून बेमुदत संपावर जाऊनही त्यांच्या मागण्यांकडे सरकार जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्यामुळे राज्यातील सर्व अंगणवाडी कर्मचारी संतप्त झाले आहेत.

यामुळे मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधून घेण्यासाठी येत्या मंगळवारपासून (ता.२८) मुंबईतील आझाद मैदानावर बेमुदत ठिय्या आंदोलन कऱण्यात येणार असल्याचे महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी कृती समितीच्या राज्य अध्यक्षा शुभा शमिम यांनी सोमवारी (ता.२७) सांगितले.




**वेतन वाढ मागण्यांसाठी हे सर्व कर्मचारी संपावर**

» मानधन नको, वेतन हवे, तूर्त मानधनात भरीव वाढ मिळालीच पाहिजे, अंगणवाडीसेविका मदतनिसांना, सरकारी कर्मचाऱ्यांचा दर्जा द्या, पोषण ट्रॅकर मराठीतून उपलब्ध करून द्या, दर्जेदार नवीन मोबाईल किंवा टॅब देण्यात यावा, सेवासमाप्ती लाभ, ग्रॅज्युइटी, मासिक पेन्शन देण्यात यावे, इंधनाचे दर व भाड्यात वाढ करा आदी मागण्यांसाठी हे सर्व कर्मचारी संपावर गेले आहेत.

अंगणवाडी कर्मचाऱ्यांना सरकारी कर्मचाऱ्यांचा दर्जा द्यावा, मानधनात वाढ करावी, या प्रमुख मागण्यांसह विविध मागण्यांसाठी सर्व अंगणवाडी कर्मचारी मागील आठवडाभरापासून बेमुदत संपावर गेले आहेत.

संप सुरु झाल्यापासून राज्यातील सर्व अंगणवाडी कर्मचारी आपापल्या तालुक्याच्या आणि जिल्ह्याच्या ठिकाणी मोर्चा, निदर्शने आणि धरणे आंदोलन करत आहेत. तरीही राज्य सरकार त्यांच्या मागण्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करू लागले आहे. यामुळे सर्व कर्मचारी संतप्त झाले असल्याने ठिय्या आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे शमीम यांनी यावेळी स्पष्ट केले. महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी कृती समितीच्या नेतृत्वाखाली अंगणवाडी कर्मचारी हे गेल्या सोमवारपासून (ता.२०) बेमुदत संपावर गेले आहेत. दरम्यान, अंगणवाडीसेविका आणि कर्मचारी हे पूर्व प्राथमिक शिक्षण, पूरक पोषक आहार, लसीकरण, लोकसंख्या शिक्षण आदी सेवा गाव पातळीवर देत असतात.

मानवी विकास निर्देशांकामध्ये आपला देश रसातळाला गेलेला असताना अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या प्रामाणिक आणि परिणामकारक कामामुळे देशाचे स्थान थोडे वर आले. तरीसुद्धा इतक्या मूलभूत विषयाबद्दल केंद्र आणि राज्य सरकार बेफिकीर आहे.

राज्याच्या महिला व बालविकास विभागाकडे या दोन्ही सरकारांचे हवे तेवढे लक्ष नसल्याने, या विभागासाठीची तरतूद सातत्याने कमी केली जात असल्याचे अंगणवाडी कर्मचारी सभेचे अध्यक्ष नितीन पवार यांनी सांगितले.

मानधन नको, वेतन हवे, तूर्त मानधनात भरीव वाढ मिळालीच पाहिजे, अंगणवाडीसेविका मदतनिसांना, सरकारी कर्मचाऱ्यांचा दर्जा द्या, पोषण ट्रॅकर मराठीतून उपलब्ध करून द्या, दर्जेदार नवीन मोबाईल किंवा टॅब देण्यात यावा, सेवासमाप्ती लाभ, ग्रॅज्युइटी, मासिक पेन्शन देण्यात यावे, इंधनाचे दर व भाड्यात वाढ करा आदी मागण्यांसाठी हे सर्व कर्मचारी संपावर गेले आहेत.

# मोशीतील नक्षत्र आयलँड सोसायटीचा पाणी प्रश्न निकालात!

## » आमदार महेश लांडगे यांनी 'शब्द' पाळला : सुमारे 70 हजार लीटर पाणी पुरवठा वाढणार

।पिंपरी।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**मोशी परिसरातील नक्षत्र आयलॅन्ड सोसायटीधारकांना पाणी समस्येचा सामना करावा लागत होता. यावर तोडगा काढण्यासाठी आमदार महेश लांडगे यांच्या सूचनेनुसार, नवीन कनेक्शन कार्यान्वीत करण्यात आले. त्यामुळे सुमारे ७० हजार लीटर अतिरिक्त पाणी पुरवठा करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. परिणामी, सोसायटीधारकांना दिलासा मिळाणार आहे.**



नक्षत्र आयलॅन्ड सोसायटीमध्ये पाणी टंचाईचा सामना करावा लागत होता. याबाबत चिखली-मोशी-पिंपरी-चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांच्यासह पदाधिकारी आणि रहिवाशांनी आमदार महेश लांडगे यांच्याकडे गाऱ्हाणे मांडले होते. यासंदर्भात सोसायटीधारकांची काही दिवसांपूर्वी बैठकही झाली होती. त्या बैठकीत लवकरात लवकर हा प्रश्न सोडवण्यात येईल, असे आश्वासन आमदार लांडगे यांनी दिले होते. दरम्यान, नवीन आळंदी रस्ता (बीआरटी) रोड येथून नवीन नळजोड देण्याबाबत प्रशासकीय पातळीवर सकारात्मक निर्णय घेण्यात आला. त्या जलवाहिनीचे काम आता पूर्ण झाले आहेत. त्याद्वारे सोसायटीधारकांना नवीन नळजोड देण्याचे कामही सुरू झाले आहे. यामुळे सुमारे ३७५ सदनिकाधारकांना दिलासा मिळणार आहे. त्यामुळे रहिवाशांनी समाधान व्यक्त केले आहे, अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते सागर हिंगणे यांनी दिली.

> **सोसायटीधारकांना पायाभूत सोयी-सुविधा सक्षमपणे देण्याबाबत आम्ही कटिबद्ध आहोत. उन्हाळ्याच्या तोंडावर काही भागामध्ये पाणीटंचाईचा समाना करावा लगत आहे. मात्र, सोसायटीधारकांनी तक्रार मांडल्यानंतर तात्काळ निराकरण करण्यासाठी आम्ही कायम पुढाकार घेतला आहे. आंद्रा धरणातील पाणी शहरात आता दाखल झाले आहे. त्याचे 'वॉटर टेस्टिंग' सुरू आहे. या प्रकल्पाचे पाणी नियमित सुरु झाल्यास समाविष्ट गावांतील नागरिकांना आणखी दिलासा मिळणार आहे.**
> **- महेश लांडगे, शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

# मतांच्या त्रिभाजनामुळे उमेदवारांमध्ये धाकधूक



।पिंपरी।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीसाठी 50.47 टक्के मतदानाची नोंद झाली आहे. महापालिकेच्या 13 प्रभागांचा समावेश असलेल्या या मतदारसंघात गेल्या पंचवार्षिक निवडणुकीपेक्षा यंदा मतदान तीन टक्क्याने घटले असले तरी प्रत्यक्षात दहा हजाराने मतदानात वाढ झाली आहे. भाजप, राष्ट्रवादीसह अपक्ष उमेदवार रिंगणात असल्याने मतांचे त्रिभाजन झाले आहे. पोटनिवडणूक असूनही एकीकडे मतदार मोठ्या संख्येने घराबाहेर पडले असताना दुसरीकडे उमेदवारांच्या बालेकिल्ल्यातच मतदारांनी निरूत्साह दाखवल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे पोटनिवडणुकीत नक्की कोण बाजी मारणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

चिंचवड विधानसभा मतदारसंघातील भाजप आमदार लक्ष्मण जगताप यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या जागेसाठी पोटनिवडणूक झाली. या जागेसाठी रविवारी (दि. 26) मतदान झाले. चिंचवड विधानसभा मतदारसंघ राज्यातील पहिल्या क्रमांकाचा मोठा मतदारसंघ आहे. चिंचवडमध्ये एकूण 5 लाख 68 हजार 954 मतदार आहेत. त्यापैकी 2 लाख 87 हजार 145 मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजाविला आहे.

या निवडणुकीत 50.47 टक्के मतदानाची नोंद झाली. चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीसाठी तब्बल 28 उमेदवार आपले भविष्य अजमावत आहेत. त्यामध्ये भाजपच्या अश्विनी जगताप, महाविकास आघाडीतील राष्ट्रवादीचे नाना काटे आणि अपक्ष उमेदवार राहुल कलाटे यांच्यात प्रामुख्याने तिरंगी लढत होत आहे.

महापालिकेच्या 13 प्रभागांचा अर्थात 52 नगरसेवकांचा समावेश या मतदारसंघात आहे. त्यामध्ये तब्बल 33 नगरसेवक भाजपचे आहेत. नऊ राष्ट्रवादीचे, सहा शिवसेनेचे तर, अपक्ष चार जण आहेत. त्यामुळे या मतदारसंघावर भाजपचा प्रभाव आहे.

# गौतमी पाटीलच्या मदतीला युवा सेना सरसावली!

## » बदनामी करणाऱ्यांवर कारवाईची मागणी : पिंपरी-चिंचवड पोलिसांना निवेदन

।पिंपरी।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।


**प्रसिद्ध लावणी कलावंत गौतमी पाटील हिची बदनामी करणाऱ्या अज्ञातांवर कडक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी पिंपरी युवासेनेकडून करण्यात आली आहे. युवासेनेने भोसरी पोलिसांकडे निवेदन देऊन ही मागणी केली आहे.**



पोलिसांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्रातील कलाक्षेत्रात गौतमी पाटील हिने अल्पावधीतच महाराष्ट्रभर नाव कमावले. परंतू प्रगती रोखता येत नसेल की समाजात बदनामी सुरू केली जाते. चुकीच्या पद्धतींने समाजमाध्यमातून गौतमी पाटीलला बदनाम करण्याचे षडयंत्र केले जात आहे. बदनामी करणारा व्हिडिओचा प्रकार निंदनीय आहे. स्त्री कपडे बदलत असताना तिचा लपून काढलेला व्हिडिओ वायरल करणे ही मर्दांनगी नाही. कलाकार म्हणून तिची कदर करा, मधल्या काळात अश्लील डान्स करून ती चुकली तिला ट्रोल केले. ती संपूर्ण महाराष्ट्राची माफी मागीतली अशातच ती पुन्हा कलाक्षेत्रात उंच गरूडझेप घेत असताना अशा चुकीच्या पद्धतीने व्हिडिओ वायरल करून समाजासमोर तिला अपमानित करणे योग्य नाही.

तरी पोलीस प्रशासनाला विनंती आहे की हा बदनामीकारक व्हिडिओ समाजमाध्यमांवर प्रसारित करणाऱ्यावर कडक कारवाई करण्यात यावी. यापुढील काळात लोककलावंतांची बदनामी विरोधात कठोर कायदा तयार करण्यात यावा असे निवेदन पिंपरी युवासेनेकडून भोसरी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भास्कर जाधव ह्यांना देण्यात आले. ह्यावेळेस पिंपरी युवा अधिकारी निलेश हाके, उपयुवा अधिकारी अविनाश जाधव, मनोज काची, चिंचप्पा निंगडोळे, हृषीकेश माने, राजू खलसे, उपस्थित होते.

# 'महाशक्ति'ने पुण्याचा केला बिहार!



भूमिका
विक्रांत पाटील
8007006862

**'महाशक्ति'-'धनशक्ति'ने क्रिकेटपटू उतरत असलेल्या एका या पंचतारांकित हॉटेलातील 16 वा संपूर्ण मजला पंधरा दिवस ताब्यात ठेवल्याचेही सांगितले जात आहे. या हॉटेलात एका सूटचा एका रात्रीचा दर 20 हजारांहून अधिक आहे. तिथे नोटबंदी करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हद्दपार केलेला काळा पैसा वारेमाप दिसून आल्याचेही किस्से सांगितले जात आहेत. दोन-दोन हजारांची बंडलेच्या बंडले मोजली जात असताना पाहिल्याचे किस्से हॉटेलचे अनेक कर्मचारी चवीने चघळत आहेत. एकूणच आम्ही निवडणुका हरुच शकत नाही, हे 'महाशक्ति'ला दाखवून द्यायचे आहे.**

'महाशक्ति'ने पुण्याचा अक्षरक्ष: बिहार केला. कसबा पेठेतील महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांना विजयापासून रोखण्यासाठी पोलिस-सरकारी यंत्रणेचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर केला गेल्याचे आरोप होत आहेत. तशा चर्चा पेठांसह शहरात सर्वत्र रंगल्या असून बरेच किस्सेही सांगितले जात आहे. पुण्यातील मीडियाने मात्र अपवाद वगळता अळीमिळी-गुपचिळी करत तोंडावर जणू बोट ठेवले आहे. माध्यमांना पाकिटे दिली गेल्याची तसेच इलेक्ट्रॉनिक मीडियासंबंधीतही अनेक चर्चा रंगल्या आहेत. काही वरीष्ठांनाही पाकिटे दिली गेल्याचे किस्से सांगितले जात आहेत.

पुण्यातील निवडणुकीत अपवाद वगळता माध्यमांची 'पेड न्यूज'ची दुकानदारीही जोरातच राहिली. मात्र, त्यावर नियंत्रण राखणारी समिती कुठेही दिसली नाही. शिवाय, निवडणूक आयोगानेही 'पेड न्यूज' रोखण्यासाठी काही प्रयत्न केल्याचे दिसून या नाही. 'महाशक्ति'-'धनशक्ति'चा अक्षरक्ष: नंगानाच दिसून आला. उभ्या हयातीत अशी निवडणूक पाहिली नसल्याचे पेठांमधील अनेक आजोबांनी सांगितले. पुण्यातील यावेळच्या निवडणुकीत पैशांचा अक्षरश: महापूर वाहत होता.

मतदानासाठी पैसे वाटप झाल्याच्या चर्चा तर आहेतच; पण मतदानाला येऊ नये म्हणून दुपटीने पैसे वाटप झाल्याचे सांगितले जात आहे. विशेषत: कोंढवा परिसर आणि धंगेकर यांचे प्रभावक्षेत्र असलेल्या भागातील अनेक मतदारांना साम-दाम-दंड-भेद अशा सर्व पद्धतीने मतदान केंद्रांवर येण्यापासून रोखल्या गेल्याच्या अनेक तक्रारी होत आहेत. 2-2, 3-3 किलो चांदीचे वाटप झाल्याचे आणि पत्रकारांना 25 हजारांपासून 2 लाखांपर्यंतच्या रकमा दिल्या गेल्याचेही सांगितले जात आहे. याशिवाय, काही अपवाद वगळता बहुतांश माध्यमांशी 'पॅकेजेस' करार झाल्याचीही चर्चा आहे. त्यामुळे टिळक-अंगरकरांच्या अन् नानासाहेब परुळेकरांच्या पुण्यातील माध्यमे डोळ्यावर झापडे ओढून पाकिस्तानातील लोकशाही धोक्यात आल्याबाबत चिंतन राग आवळत राहिले.

'महाशक्ति'-'धनशक्ति'ने क्रिकेटपटू उतरत असलेल्या एका या पंचतारांकित हॉटेलातील 16 वा संपूर्ण मजला पंधरा दिवस ताब्यात ठेवल्याचेही सांगितले जात आहे. या हॉटेलात एका सूटचा एका रात्रीचा दर 20 हजारांहून अधिक आहे. तिथे नोटबंदी करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हद्दपार केलेला काळा पैसा वारेमाप दिसून आल्याचेही किस्से सांगितले जात आहेत. दोन-दोन हजारांची बंडलेच्या बंडले मोजली जात असताना पाहिल्याचे किस्से हॉटेलचे अनेक कर्मचारी चवीने चघळत आहेत. एकूणच आम्ही



निवडणुका हरुच शकत नाही, हे 'महाशक्ति'ला दाखवून द्यायचे आहे.

'महाशक्ति'ने धंगेकरांचे 15 ते 16 हजार हक्काचे मतदान होऊ दिले गेले नाही, अशीही चर्चा आहे. आदल्या रात्रीच मतदारांना पैसे वाटले गेले आणि त्यांना मतदान करायला मिळू नये म्हणून तयांच्या हाताच्या बोटांवर निवडणूक आयोगाच्या शाईसारखीच शाई लावली गेली, असेही आरोप होत आहेत. दोन दिवसपूर्वीच राज्यातील सत्तास्थानाच्या आघाडीच्या नेत्यांनीच खुद्द काँग्रेस-राष्ट्रवादीच्या नगरसेवकांना बोलावून घेवून कोणत्याही प्रकरणात अडकवण्याचा दम दिला, असेही सांगितले जात आहे. ऐनकेन प्रकारे आघाडीच्या मंडळींना प्रचारापासून तसेच धंगेकर यांना मदत करण्यापासून रोखले गेले. बिहार-उत्तरप्रदेशातील निवडणूक राड्याची तसेच पोलिस व सरकारी यंत्रणेच्या गैरवापराची चित्रपटात दाखविली जाणारी दृश्ये अक्षरक्ष: फिकी पडावीत, असे चित्र पुण्यात दिसून आल्याचे नागरिकही सांगत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, रवींद्र धंगेकर यांच्या बाजूने सुरुवातीपासून वातावरण अतिशय चांगले होते. ते 20-25 हजारांच्या मताधिक्क्याने निवडून येतील, असे चित्र होते. मात्र, शेवटच्या 3-4 दिवसांत पोलिस यंत्रणेचा मोठ्या प्रमाणावर सक्रीय सहभाग दिसून आला. त्यातच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे स्वत: शेवटच्या आठवडाभर पुण्यात कोंढवा मुक्कामी होते. कोल्हापूर व काही बाहेरचे कार्यक्रम करून ते पुण्यातच परतत होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तर ही निवडणूक अतिशय प्रतिष्ठेची करून घेतली होती. ते 2 आठवडे पुण्यात तळ ठोकून होते. मात्र, गृहमंत्री शहरात असताना पोलिस यंत्रणेचा गैरवापर होण्याच्या घटना चिंताजनक म्हणायला हव्यात. त्याचप्रमाणे राज्याचे प्रमुख शहरात असताना शासकीय यंत्रणेचा चुकीचा वापर झाल्याचेही आरोप होत आहेत. पोलिसांनी तर शेवटच्या 2 दिवसांत कमालीचा अतिरेक केल्याचे सांगितले जाते. धंगेकर यांचे समर्थक, कार्यकर्ते यांना उचलून नेणे, रात्र-रात्रभर पोलिस स्टेशनला बसवून ठेवणे, असे प्रकार घडल्याचे सांगितले जात आहे.

---

# भावी मुख्यमंत्री कोण?



भाष्य
नितीन सावंत
91 9892514124

**विधानसभा निवडणुकीला सुमारे दीड वर्ष बाकी असतानाच राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मुख्यमंत्री पदाची चर्चा सुरू झाली आहे. शिंदेसेना विरुद्ध उद्धव सेना असा वाद राज्यात सुरू असतानाच राष्ट्रवादीच्या अति उत्साही कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्रीपदाची चर्चा सुरू केली आहे. मुंबईतील काही भागात भावी मुख्यमंत्री सुप्रिया सुळे असे बोर्ड झळकले होते त्याचबरोबर एकच वादा अजित दादा असे बोर्डही मोठ्या प्रमाणात लागले होते.**

एका गटाला खासदार सुप्रिया सुळे या मुख्यमंत्री हव्यात तर दुसऱ्या गटाला त्यांचे बंधू अजितदादा पवार हे मुख्यमंत्री हवें आहेत. शिवसेना विरुद्ध उद्धव सेना हा वाद टोकाला गेल्यामुळे या बातमीकडे फारसे कुणाचे लक्ष गेले नाही. परंतु सुप्रिया सुळे यांनी या बॅनरबाजी वरून आपल्या विरोधी पक्षांना जबाबदार धरले आहे. आपल्या पक्षात मुख्यमंत्रीपदावरून कोणताही वाद नाही असा खुलासा करत असे बोर्ड कोणी लावले याचा शोध घेण्याची मागणी त्यांनी पोलिसांकडे केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सध्या राज्यात अजितदादा पवार यांच्याकडे शक्तिशाली नेता म्हणून पाहिले जाते. त्याचबरोबर प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे त्यांचे पक्षांतर्गत विरोधक समजले जातात. या विरोधाला दस्तूर खुद्द शरद पवारांची फूस आहे अशी एक चर्चा आहे. सध्या विधानसभेत विरोधी पक्ष नेते असलेल्या अजित दादांचे पंख शरद पवारांनी कापल्याचे म्हटले जाते. 2004 साली राष्ट्रवादी काँग्रेसच्या ७१ जागा निवडून आल्या होत्या तर काँग्रेसला ६९ जागांवर समाधान मानावे लागले होते. त्यावेळी मुख्यमंत्री पदाचे दावेदार अजित दादा पवार असताना राष्ट्रवादी काँग्रेसने मुख्यमंत्रीपदावर पाणी सोडले होते. त्या बदल्यात त्यांनी काँग्रेस कडून केंद्रात प्रफुल्ल पटेल यांच्यासाठी विमान वाहतूक मंत्रालयाचा स्वतंत्र कार्यभार असलेले राज्यमंत्री पद घेतले होते आणि आणि राज्यात तीन अधिक खाती काँग्रेसकडून घेतली होती. केवळ अजित पवार यांना मुख्यमंत्री पद मिळू नये म्हणून शरद पवार यांनी मुख्यमंत्रीपदावर पाणी सोडले होते. आता शरद पवारांना कोणत्याही परिस्थितीत सुप्रिया सुळे यांना मुख्यमंत्रीपदी बसवायचे आहे, अशी चर्चा राष्ट्रवादी काँग्रेसमध्येच सुरू आहे.

महाविकास आघाडी मधील सर्वात मोठा



असलेला पक्ष शिवसेना हा बंडखोरीमुळे जर्जर झाला आहे. त्यामुळे पुढच्या निवडणुकीत राज्यात एक नंबरचा पक्ष हा राष्ट्रवादी काँग्रेस असेल या दृष्टीने शरद पवारांची बांधणी सुरू आहे. त्यामुळेच आतापासूनच राष्ट्रवादी काँग्रेसचा विधिमंडळ काँग्रेस पक्षाचा नेता कोण असेल? याची चर्चा शरद पवारांच्या निकटवर्ती यांनी सुरू केली आहे. यातूनच खासदार सुप्रिया सुळे भावी मुख्यमंत्री किंवा अजित दादा पवार भावी मुख्यमंत्री अशा चर्चेला तोंड फुटले आहे. विधिमंडळ नेता हे विधिमंडळातील आमदार ठरवतात असे ठेवणीतले उत्तर देऊन शरद पवार मोकळे होतील परंतु विधानसभेपूर्वीच पक्षात अशी दुही पेरली गेली तर निवडणुकीत काय होईल हे आत्ताच सांगता येणार नाही.

## शिळ्या कढीला ऊत

देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या पहाटेच्या शपथविधीची चर्चा पुन्हा एकदा सुरू झाली आहे. खरे म्हणजे या चर्चेला काहीच अर्थ नाही. परंतु अचानक ही चर्चा सुरू होण्याचे कारण काय? याची माहिती शरद पवार आणि दस्तूर खुद्द फडणवीसच देऊ शकतील.खरे म्हणजे पहाटेच्या शपथविधीची चर्चा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरु केली. चिंचवड आणि कसबा या दोन मदत मतदार संघाच्या पोट निवडणुका जाहीर झाल्यानंतर ही चर्चा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरू केली. राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा हे कोणत्या क्षणी भाजपसोबत येऊ शकतात, हे सांगण्यासाठीच ही चर्चा त्यांनी सुरू केली. विशेष म्हणजे देवेंद्र फडणवीस हे मुरब्बी राजकारणी आहेत हे त्यांनी वेळोवेळी सिद्ध केले आहे. ही चर्चा सुरु करून शरद पवारांच्या राजकारणातील क्रेडिबिलिटि बाबत शंका घेण्यास सुरुवात करायची आणि व्यवस्थित त्यांना कोंडीत पकडायचे हाच यामागे हेतू होता. हा हेतू बऱ्यापैकी सफलही झाला आहे.

2014 साली भाजपने शिवसेनेशी युती तोडून स्वतंत्रपणे निवडणूक लढवली होती. त्यावेळी भाजप ला पूर्ण बहुमत मिळाले नव्हते.124 वर त्याचा घोडा अडखळला होता. भाजपने पाठिंबा न घेता आवाजी मतदानाने विधानसभेत आपले बहुमत सिद्ध केले होते. तत्कालीन विरोधी पक्षनेते एकनाथ शिंदे यांची पोलची मागणी ही अध्यक्षांनी धुडकावली होती. राष्ट्रवादी काँग्रेस चा हा पाठिंब्याचा गेम यशस्वी झाला होता.राष्ट्रवादी काँग्रेस सत्तेत सहभागी होईल या भीतीने शिवसेना विरोधी पक्षनेते पद सोडून भाजप सोबत सत्तेत सहभागी झाली.आता सुद्धा राष्ट्रवादी काँग्रेस बाबत शंकेचे वातावरण निर्माण करण्यासाठी शिळ्या कढीला उत आणण्याचा प्रकार सुरू आहे.त्यामागे कारणे ही तशी आहेत. 1999साली काँग्रेस मधून बंडखोरी केल्यापासून शरद पवार यांच्यावर विश्वास ठेवण्यास कुणी तयार नाही.1978 साली वसंतदादा पाटील यांचे सरकार पाडून शरद पवार मुख्यमंत्री झाले होते,याची आठवण ही काँग्रेस वाले वेळोवेळी करून देतात.

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला '**महाईन्यूज**'च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# हिंदू गर्जना: शांततेला गालबोट!

## संयोजकांसह 15-20 व्यक्तींविरुध्द गुन्हा दाखल

| सोलापूर | महाईन्यूज |

**लव्ह जिहाद आणि धर्मांतरविरोधी कायदा व्हावा, गोहत्या बदी कायद्याची कठोर अंमलबजावणी व्हावी आदी मागण्यांसाठी काल सोलापुरात हिंदू गर्जना मोर्चामध्ये शांततेला गालबोट लागून एका धर्मस्थळासह काही दुकानांवर जाणीवपूर्वक पाण्याच्या बाटल्या फेकून दोन धर्मामध्ये शत्रुत्व आणि द्वेषाची भावना वाढविल्याप्रकरणी पोलिसांनी मोर्चाच्या संयोजकांसह १५-२० व्यक्तींविरूध्द गुन्हा दाखल केला आहे.**

सकल हिंदू समाजाच्यावतीने काल हिंदू गर्जना मोर्चा काढण्यात आला होता. हजारो जनसमुदायाचा सहभाग असलेला हा मोर्चा एका धार्मिकस्थळाजवळ येताच मोर्चातील चार-पाच अज्ञात व्यक्तींनी हुल्लडबाजी करून धार्मिकस्थळावर पाण्याच्या बाटल्या फेकल्या, दोन धर्मात शत्रूत्व आणि द्वेषभावना वाढवून सामाजिक एकोपा टिकण्यास बाधा होईल, असे कृत्य केले. तसेच मोर्चातील १५-२० अज्ञात व्यक्तींनी पुढे दत्त चौकासह आसार मैदान परिसरातील काही विशिष्ट दुकानांवर पाण्याच्या बाटल्या फेकून नामफलकाचे आणि विद्युत दिव्यांचे नुकसान केले. मोर्चामध्ये कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही, याची योग्य दक्षता घेण्याची जबाबदारी मोर्चाच्या आयोजकांची असताना त्यांनी हयगयीचे कृत्य केले, असे फौजदार चावडी पोलीस ठाण्यात महिला फौजदार राधा जेऊघाले यांनी नोंदविलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. यात आरोपी म्हणून सकल हिंदू समाजाचे समन्वयक अंबादास लक्ष्मण गोरंट्याल, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे रंगनाथ बंकापूर, पुरूषोत्तम कारकल आदींची नावे आरोपी म्हणून नमूद आहेत.तथापि, पोलिसांनी केलेल्या या करावाईला हिंदू राष्ट्र सेनेचे संयोजक धनंजय देसाई यांनी तीव्र आक्षेप घेतला आहे. मोर्चात सहभागी झालेल्या हिंदू बांधवांनी असे कोणतेही आक्षेपार्ह कृत्य केले नाही, असा दावा करण्यात आला आहे.

### मोर्चात हयगयीचे कृत्य

**» मोर्चातील १५-२० अज्ञात व्यक्तींनी पुढे दत्त चौकासह आसार मैदान परिसरातील काही विशिष्ट दुकानांवर पाण्याच्या बाटल्या फेकून नामफलकाचे आणि विद्युत दिव्यांचे नुकसान केले. मोर्चामध्ये कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही, याची योग्य दक्षता घेण्याची जबाबदारी मोर्चाच्या आयोजकांची असताना त्यांनी हयगयीचे कृत्य केले, असे फौजदार चावडी पोलीस ठाण्यात महिला फौजदार राधा जेऊघाले यांनी नोंदविलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.**



# जुनी पेन्शन लागू करा: अन्यथा देशभरात ट्रेन बंद करू

## कर्मचारी संघटनेचा इशारा

| मुंबई | महाईन्यूज |

**केंद्र सरकारने रेल्वे कर्मचाऱ्यांची जुनी पेन्शन योजना बंद करुन नवी पेशन्स योजना लागू केली आहे. त्यामुळे रेल्वे कर्मचारी संघटना आक्रमक झाल्या आहेत. जुनी पेन्शन योजना सुरू करण्यासाठी मुंबईत मराठी पत्रकार संघात वेस्टर्न रेल्वे एम्प्लॉइज युनियने पत्रकार परिषद घेतली आहे.**

तसेच केंद्र सरकारने जुनी पेंशन तात्काळ लागू करावी अन्यथा वेळ पडल्यास रेल्वे बंद करण्याचा इशाराही वेस्टर्न रेल्वे एम्प्लॉइज युनियने दिला आहेत.ऑल इंडिया रेलवे मेंस फेडरेशनचे महामंत्री शिवगोपल मिश्रा यांनी आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले की, १ जानेवारी २००४ पासून केंद्रासहित देशातील काही राज्यात आणि नंतर काही काळाने सर्वच राज्यात नवीन राष्ट्रीय पेंशन स्कीम लागू करण्यात आली.या पेंशनचा सर्वात जास्त फटका सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांना झालेला आहे. तेव्हा केंद्र सरकारने कर्मचारी वर्गाला एक रक्कमी काही लाख रूपये जमा होतील असे दिलेले आश्वासन फोल ठरल्याचे लक्षात येत आहे.

त्यामुळे पुन्हा जुनी पेंशन केंद्र सरकारने तात्काळ लागू करावी या मागणीला जोर धरू लागला. त्यामुळे केंद्र सरकारने जुनी पेंशन तात्काळ लागू करावी अन्यथा देशभरात आंदोलनाची हाक देण्यात येईल असा इशारा शिवगोपल मिश्रायांनी केंद्र सरकरला दिला आहे. सैनिकासारखे काम करून प्रवाशांना त्यांच्या इच्छित स्थळी पोहचवतात. ट्रॅकवर काम करणाऱ्या शेकडो कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला आहे. मग सेनेमध्ये काम करणाऱ्या सैनिकांप्रमाणे तसेच खासदार आणि आमदार यांच्याप्रमाणे रेल्वेच्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना का लागू नाही, असा प्रश्न वेस्टर्न रेल्वे एम्प्लॉइज युनियनकडून विचारण्यात आलेला आहे.




### लोकप्रतिनिधी प्रमाणे जुनी पेन्शन द्या

**» २००४ नंतर भरती झालेल्या कर्मचाऱ्यांवर ही योजना थोपवून त्यांची वृद्धापकाळातील काठी सरकारने काढून घेतली आहे. त्यामुळे त्यांच्या कुटुंबियांचे सेवानिवृत्त जीवन अंधकारमय होणार आहे. नवीन पेन्शन योजनेत ग्रॅच्युइटी आणि फॅमिली पेन्शन दिली जाणार आहे. रेल्वेचे कर्मचारी दिवस रात्र काम करतात. प्रतिकूल परिस्थितीमध्ये कोणत्याही मौसमात ते काम करतात.**

# 'निवडणूक आयोग बोगस, चुना लावणारा आयोग'!

## उद्धव ठाकरे यांचं खूप मोठं वक्तव्य

| नाशिक महाईन्यूज |

**उद्धव ठाकरे यांनी आज पहिल्यांदाच केंद्रीय निवडणूक आयोगावर जोरदार टीका केली आहे. "निवडणूक आयोग बोगसच आहे. त्याला निवडणूक चुना लगाओ आयोग का म्हणत नाही तेच कळत नाही", असा घणाघात त्यांनी केला.**

ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज पहिल्यांदाच केंद्रीय निवडणूक आयोगावर जोरदार टीका केली आहे. "निवडणूक आयोग बोगसच आहे. त्याला निवडणूक चुना लगाओ आयोग का म्हणत नाही तेच कळत नाही. आमचा विश्वास उडालेला आहे. निवडणूक चुनाव आयोग नाही तर चुना लावणारा आयोग आहे", असा घणाघात उद्धव ठाकरे यांनी केला. मराठी भाषा गौरव दिनानिमित्ताने जागर मराठी भाषेचा कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमात उद्धव ठाकरे यांनी भाजप आणि निवडणूक आयोगावर टीका केली. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरही निशाणा साधला.

"असं कधी घडलं नव्हतं. राम विलास पासवान यांच्या पक्षातसुद्धा असा वाद झालेला आहे. तिकडे त्यांनी जे केलेलं आहे, किती वर्ष झाली वाद सुरु आहे. वाद सुरु



# अखेर पितळ उघडं पडलंच!

## » कोरोना विषाणू चीनच्या वुहानच्या लॅबमध्येच बनवण्यात आला होता, अमेरिकेचा खुलासा

। चीन । महाईन्यूज ।

**कोरोना व्हायरस कुठून आला? याचा उगम कसा झाला? हे कोडं अद्याप काही सुटले नाही. पण अमेरिकेने एक खुलासा करत यावर या चर्चांवर पूर्णविराम लावला आहे.**

चीनमध्ये हाहाकार माजवणारा हा विषाणू संपूर्ण देशभर शिरकाव करतो आणि बघता बघता जगात मृत्यूचं थैमान घातलं. जगातील अनेक देशांनी कोरोनाला तोंड देण्यासाठी ‘लस’ बनवली असली तरी धोका अजून टळलेला नाही. चीनमध्येच कोरोनाने कहर केला. कोरोना व्हायरस कुठून आला? याचा



उगम कसा झाला? हे कोडं अद्याप काही सुटले नाही. पण अमेरिकेने एक खुलासा करत यावर या चर्चांवर पूर्णविराम लावला आहे. कोरोना विषाणू चीनच्या वुहानच्या लॅबमध्येच बनवण्यात आला होता. चीनने नेहमीच हे आरोप फेटाळून लावले आहेत. पण अमेरिकन तपास यंत्रणांनी अनेक पुरावे दिले आहेत, ज्यामुळे संपूर्ण संशय धूर्त चीनच्या दिशेने बळावतो आहे.

अमेरिकेच्या ऊर्जा विभागाने कोरोनाबाबत नवा खुलासा केला आहे. अमेरिकेच्या ऊर्जा विभागाने म्हटलंय की, बहुधा कोरोना विषाणूची उत्पत्ती चीनमधील प्रयोगशाळेतून झाली आहे. अहवालात असंही म्हटलं आहे की, ऊर्जा विभाग प्रथम व्हायरसच्या उत्पत्तीबद्दल ठाम नव्हता. परंतू २०२१ मधल्या नॅशनल इंटेलिजेंस डायरेक्टर एव्हरिल हेनेसच्या एका अहवालात सुत्रांच्या आधारे मिळवलेली माहिती देण्यात आली.

या एजन्सीकडे उत्कृष्ट वैज्ञानिक तज्ञ आहेत. त्यामुळे हा अहवाल आणखी महत्त्वाचा आहे. ऊर्जा विभाग यूएस राष्ट्रीय प्रयोगशाळांच्या नेटवर्कची देखरेख देखील करतो, ज्यापैकी काही प्रगत जैविक संशोधन करतात. यासोबतच गुप्तचर अहवालाद्वारे नुकत्याच झालेल्या अहवालाची माहिती देण्यात आली. इतकेच नाही तर नुकतेच व्हाईट हाऊस आणि काँग्रेसच्या प्रमुख सदस्यांनाही ते देण्यात आले आहे.

अहवालात असंही म्हटलंय आहे की कोविड-19 विषाणूचा प्रसार चीनच्या प्रयोगशाळेतूनच झाला असावा. तत्पूर्वी, एफबीआयने असेही निष्कर्ष काढले की २०२१ मध्ये चीनमधील प्रयोगशाळेत लीकमुळे कोरोना व्हायरस जगभर पसरला. २०१९ च्या उत्तरार्धात चीनच्या वुहान शहरात कोरोना व्हायरस सगळ्यात आधी आढळून आला. तेव्हापासून चीनकडे त्याच्या उत्पत्तीबाबत संशयाने पाहिले जात आहे.

### चर्चांवर पूर्णविराम लावला

**» चीनमध्येच कोरोनाने कहर केला. कोरोना व्हायरस कुठून आला? याचा उगम कसा झाला? हे कोडं अद्याप काही सुटले नाही. पण अमेरिकेने एक खुलासा करत यावर या चर्चांवर पूर्णविराम लावला आहे. कोरोना विषाणू चीनच्या वुहानच्या लॅबमध्येच बनवण्यात आला होता. चीनने नेहमीच हे आरोप फेटाळून लावले आहेत. पण अमेरिकन तपास यंत्रणांनी अनेक पुरावे दिले आहेत, ज्यामुळे संपूर्ण संशय धूर्त चीनच्या दिशेने बळावतो आहे.**

# “काही लोक माझी कबर खोदण्यात...”

## बेळगावात पंतप्रधान मोदींचं विधान!

।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।



कर्नाटक विधानसभेच्या निवडणुका काही दिवसांवर येऊन ठेपल्या आहेत. आगामी निवडणुकीच्या तोंडावर विविध राजकीय पक्ष मैदानात उतरले आहेत.

सत्ताधारी भारतीय जनता पार्टीसह काँग्रेस आणि जेडीएस पक्षाकडून मोर्चेबांधणी सुरू आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या कर्नाटक दौऱ्यावर गेले आहेत.

आज कर्नाटकमधील बेळगाव येथील जाहीर सभेतून पंतप्रधान मोदी यांनी जोरदार टीकास्त्र सोडलं. काँग्रेसचे लोक प्रचंड निराश झाले आहेत. जोपर्यंत मोदी जिवंत आहे, तोपर्यंत आपली डाळ शिजणार नाही, असं काँग्रेसच्या लोकांना वाटत आहे. त्यामुळे ‘मोदी मरून जा, मोदी मरून जा’ अशा घोषणा ते देत आहेत, अशा शब्दांत पंतप्रधान मोदींनी काँग्रेसवर टीका केली आहे. बेळगाव येथील जाहीर सभेत नरेंद्र मोदी म्हणाले, “काँग्रेससारख्या राजकीय पार्टीपासून कर्नाटकमधील लोकांनी सतर्क राहायला हवं. काँग्रेसची लोक प्रचंड निराश झाले आहेत.

जोपर्यंत मोदी जिवंत आहे, तोपर्यंत त्यांची डाळ शिजणार नाही, असा विचार ते करत आहेत. त्यामुळे आजकाल सगळेजण ‘मोदी मरून जा, मोदी मरून जा’ अशा घोषणा देत आहेत. काही लोक माझी कबर खोदण्यात व्यग्र झाले आहेत. ‘मोदी तुझी कबर खोदली जाईल,’ असं ते म्हणत आहेत. पण ‘मोदी तुझं कमळ फुलेल’ असं देश म्हणत आहे.”

# “तुम्हाला देश कायम अशांत ठेवायचाय का?”

## » सर्वोच्च न्यायालयाने भाजपा नेत्याला सुनावलं!

।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रात सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीची जोरदार चर्चा आहे. ही सुनावणी महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाच्या बाबतीतली आहे. मात्र, आज सर्वोच्च न्यायालयातील वेगळ्याच सुनावणीची चर्चा राष्ट्रीय स्तरावर सुरू झाली आहे. कारण देशपातळीवर घडणाऱ्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर ही याचिका दाखल करून केंद्रात ‘नावबदल आयोगा’ची (RENAMING COMMISSION) स्थापना करण्याची मागणी करण्यात आली होती. ही याचिका न्यायालयाने फेटाळली असून ती दाखल करणाऱ्या भाजपा नेत्याला परखड शब्दांत सुनावलं आहे.**

भाजपाचे दिल्लीतील नेते आणि सर्वोच्च न्यायालयात वकिली करणारे अश्विनी कुमार उपाध्याय यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेमध्ये देशावर अतिक्रमण करणाऱ्या परकीय शासकांची किंवा व्यक्तींची देशातील विविध ऐतिहासिक ठिकाणांना देण्यात आलेली नावं बदलण्याच्या परवानगीची मागणी करण्यात आली होती. त्यासाठी केंद्रीय पातळीवर नावबदल आयोगाची स्थापना करण्यात यावी, अशीही मागणी याचिकेत करण्यात आली होती. ही याचिका न्यायालयाने स्पष्ट शब्दांत फेटाळून लावली आहे.

“देश कायम पुढे जात राहाणं महत्त्वाचं आहे. कोणत्याही देशाचा इतिहास त्या देशाचा वर्तमानकाळ




आणि भविष्यकाळावर अशा प्रकारे दहशत निर्माण करू शकत नाही जेणेकरून येणाऱ्या पिढ्या या भूतकाळातच अडकून पडतील”, असंही न्यायालयाने यावेळी नमूद केलं. गेल्या काही दिवसांमध्ये ऐतिहासिक ठिकाणांची मुघलकालीन किंवा ब्रिटिशकालीन नावं बदलून नवी नावं दिली जात आहेत. या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या या निकालावरून नामकरणांचा नव्याने चर्चा सुरू झाल्याचं पाहायला मिळत आहे.

### “देशातील दुसरे प्रश्न संपलेत का?”

**» देशासमोरचे इतर प्रश्न संपलेत का? असा परखड सवाल न्यायालयाने यावेळी याचिकाकर्त्याला केला. “भूतकाळात घडलेल्या घडामोडी बदलण्याशिवाय आपल्याकडे इतर कोणत्या समस्या नाहीयेत का? भारत एक धर्मनिरपेक्ष देश आहे. जर एका कुठल्यातरी धर्माच्या दिशेने अंगुलीनिर्देश करून तुम्हाला देश कायम अशांत ठेवायचा आहे का?” असा प्रश्न न्यायमूर्ती के. एम. जोसेफ यांनी उपस्थित केला. “हे धर्मनिरपेक्षतेच्या तत्वाच्या विरोधात आहे. मी कदाचित इथे माझा संताप व्यक्त करू शकतो. अशा प्रकारच्या याचिकांनी भारताच्या धर्मनिरपेक्षतेला तडा जाऊ देऊ नका”, असंही न्यायालयाने अश्विनी कुमार उपाध्याय यांना सुनावलं.**

# अखेर प्रार्थना बेहरेच्या आयुष्यात आला 'तो'



मराठी मनोरंजन सृष्टीतील आघाडीच्या अभिनेत्रींच्या यादीत प्रार्थना बेहरेचं नाव सामील आहे. मालिका असो अथवा चित्रपट; तिने तिच्या कामाने सर्व प्रेक्षकांना भुरळ घातली आहे. काही दिवसांपूर्वी पर्यंत ती 'माझी तुझी रेशीमगाठ' या मालिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येत होती. पण आता ती काय करते हे जाणून घेण्यासाठी तिचे चाहते उत्सुक होते.

याची माहिती स्वतः प्रार्थना आणि एक पोस्ट शेअर करत दिली. प्रार्थना नेहमीच सोशल मीडियावर सक्रिय राहून तिच्या आयुष्यात घडणाऱ्या महत्त्वाच्या घडामोडी चाहत्यांची शेअर करत असते. आता तिने तिचा एक खास व्हिडिओ पोस्ट केला आणि तब्बल पंधरा वर्षांनंतर तिच्या आयुष्यात एक खास क्षण आला असल्याचं तिने चाहत्यांना सांगितलं. प्रार्थनाच्या या व्हिडीओवर कमेंट करत अनेकांनी तिला शुभेच्छा दिल्या. तर त्याच बरोबर या नृत्य प्रकाराचं ती सादरीकरण करत असल्याने तिचं अभिनंदनही केलं. आता या व्हिडीओमध्ये प्रार्थनाची एक वेगळी बाजू न व्या ने तिच्या चाहत्यांसमोर उलगडली गेली आहे.

# भारतीयांना कॉपी करण्यात आयुष्य गेलं' पाकिस्तानी अभिनेत्री उस्ना शाह



भारत आणि पाकिस्तान याचे सबंध हे काही कोणापासून लपलेल नाही. पाकिस्तानात काहीही झालं की त्यांची भारतीयांशी होतेच. तसं काहीस आताही झालं आहे. नुकतचं पाकिस्तानी टीव्ही अभिनेत्री उस्ना शाहने लग्नगाठ बांधली आहे. तिने लग्नाचा व्हिडिओ शेअर करताच तिचा लाल रंगाचा लेहेंगा आणि ब्राइडल लूक हा विषेश चर्चेचा विषय बनला. तिच्याच देशातल्या लोकांना तिचा राग आला आणि त्यांनी तिला ट्रोल केलं. लोक म्हणाले की ती तिची संस्कृती विसरली आहे आणि ती भारतीय वधूप्रमाणं श्रृंगार केलायं.पाकिस्तानी अभिनेत्री उस्ना शाहने गोल्फर हमजा अमीनशी लग्न केले. सोशल मीडियावर नवविवाहित जोडप्याचे फोटो आणि व्हिडिओ खूप व्हायरल होत आहेत. उस्नाने तिच्या खास दिवशी लाल रंगाचा लेहेंगा घातला होता. त्याच्या लग्नात त्याने खूप एन्जॉय केले आणि जोरदार नाचले. मात्र, काही लोक तिच्या लग्नातील पोशाख आणि नृत्यावर खूश नाहीत.हे पाहिल्यानंतर एका यूजरने कमेंट केली की, हा 'पाकिस्तानींची स्वतःची संस्कृती आणि धर्म आहे. भारतीय संस्कृती पाकिस्तानात आणण्याचा प्रयत्न थांबवा. आम्ही मुस्लिम आहोत आणि आमचा धर्म आम्हाला असे कपडे घालण्याची परवानगी देत नाही. नकारात्मकता पसरवणे थांबवा. आणखी एका युजरने लिहिले, 'पाकिस्तानी नववधूनं अशा भारतीय स्टाईलमध्ये का कपडे घालत आहेत?

# अवॉर्ड सोहळ्यातील 'त्या' व्हिडीओमुळे कियारा आडवाणी ट्रोल



अभिनेता सिद्धार्थ मल्होत्रा आणि कियारा अडवाणी यांनी काही दिवसांपूर्वीच लग्न केलं. या दोघांच्या लग्नाची सोशल मीडियावर खूप चर्चा झाली होती. त्यानंतर दोघंही बरेचदा एकत्र स्पॉट झाले आणि या जोडीला चाहत्याची चांगलीच पसंती मिळाली. पण नुकत्याच झालेल्या एका अवॉर्ड फंक्शनमध्ये मात्र या दोघांनी एकत्र हजेरी लावली नाही. दोघंही वेगवेगळे या पुरस्कार सोहळ्याला पोहोचले. याशिवाय या पुरस्कार सोहळ्यातील एका व्हिडीओमुळे आता कियार अडवाणीला ट्रोल केलं जात आहे.

लग्नानंतर पहिल्यांदाच सिद्धार्थ-कियाराने एका पुरस्कार सोहळ्याला हजेरी लावली. त्यामुळे सर्वांच्या नजरा त्यांच्यावर खिळल्या होत्या. यावेळी कियाराने पिवळ्या रंगाची साडी परिधान केली होती. लग्नानंतर सार्वजनिक कार्यक्रमाला हजेरी लावण्याची सिद्धार्थ-कियाराची ही पहिलीच वेळ होती. मात्र या ठिकाणी दोघंही वेगवेगळे पोहोचल्याने सर्वांच्या भुवया उंचावल्या. तसेच कियारा अडवाणीला ट्रोलही केलं गेलं. कियारा अडवाणीचा या पुरस्कार सोहळ्यातील एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. ज्यात तिने मंगळसूत्र, वेडिंग रिंग घातलेली नाही. तसेच सिंदूरही लावलेला नाही. त्यावरुन येणाऱ्या काळात लग्नाचं काय महत्त्व राहणार आहे अशी चर्चा सोशल मीडियावर सुरू झाली आहे. एका युजरने या व्हिडीओवर कमेंट करताना, "ना मंगळसूत्र ना सिंदूर ना वेडिंग रिंग, हे लग्न आहे की ड्रामा?" असा सवाल केला आहे. तर काही युजर्सनी, "फॅशनच्या नादात लग्न झालंय हे विसरून गेले आहेत" असा टोलाही लगावला आहे. दरम्यान सिद्धार्थ आणि कियाराने ७ फेब्रुवारीला जैसलमेर येथील सूर्यगढ पॅलेसमध्ये लग्न केलं होतं.

# 'मेरे सपनों का राजा नव्हे तर राणी...सारा अली खानच्या फोटोची रंगली चर्चा

बॉलिवूड अभिनेत्री सारा अली खान सोशल मीडियावर खूप सक्रिय असते. आता तिने आजी आणि ज्येष्ठ अभिनेत्री शर्मिला टागोरसोबतचा स्वतःचा एक फोटो पोस्ट केला आहे, ज्यावर चाहते खूप प्रेम करत आहेत. फोटोमध्ये दोन्ही स्टार्स कॅमेऱ्यासमोर हसत हसत पोज देत आहेत.सारा अली खानने आजी शर्मिला टागोरसोबतचा तिचा हा फोटो तिच्या इंस्टाग्राम हँडलवर शेअर केला आहे, जो इंटरनेटवर प्रचंड व्हायरल होत आहे. फोटोमध्ये शर्मिला टागोर निळ्या रंगाची साडी आणि मॅचिंग कलर ब्लाउजमध्ये दिसत आहे.यासोबतच त्यांनी शालही घेतली आहे. दुसरीकडे, सारा अली खान निळ्या आणि पांढ्या रंगाच्या सूटमध्ये सुंदर दिसत आहे. तिने पांढ्या रंगाची शाल परिधान केलेली दिसत आहे. फोटो पोस्ट करत 'अतरंगी रे' अभिनेत्री सारा अली खानने कॅप्शनमध्ये लिहिले, 'मेरे सपनों की रानी'. यासोबतच त्याने क्राउन इमोजीही तयार केले आहे. मेरे सपनो की रानी हे गाणे किशोर कुमारने गायले आहे. हे गाणे आराधना (१९६९) या चित्रपटातील आहे ज्यात राजेश खन्नासोबत शर्मिला टागोरेने मुख्य भूमिका साकारली होती.सारा अली खान शेवटची अतरंगी रे या चित्रपटात दिसली होती, ज्यामध्ये तिने अक्षय कुमार आणि धनुषसोबत काम केले होते. आता ती लक्ष्मण उतेकर यांच्या चित्रपटात दिसणार आहे, ज्यामध्ये तिची जोडी विकी कौशलसोबत दिसणार आहे.याशिवाय साराकडे 'ए वतन मेरे वतन' हा चित्रपटही आहे.



# T20 वर्ल्ड कप विजेती ऑस्ट्रेलिया टीम मालामाल!

## तर टीम इंडियादेखील कोट्याधीश

।वेलिंग्टन ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**ऑस्ट्रेलियाने पुन्हा एकदा महिला T20 वर्ल्ड कपवर आपलं नाव कोरलं आहे. रविवार 26 फेब्रुवारीला मेग लेनिंगच्या नेतृत्वाखाली ऑस्ट्रेलियन टीमने फायनलमध्ये यजमान दक्षिण आफ्रिकेला 19 धावांनी पराभूत केलं.**

ऑस्ट्रेलियाने महिला टी 20 वर्ल्ड कप जिंकण्याची ही सहावी वेळ आहे. चॅम्पियनशिपसोबत ऑस्ट्रेलियाने टी 20 वर्ल्ड कप जिंकण्याची हॅट्रिक केली. विजयानंतर ऑस्ट्रेलियाला टीम मालामाल झाली आहे.



### तर टीम इंडियादेखील कोट्याधीश

**उपांत्य फेरीतील पराभवासाठी भारत आणि इंग्लंड दोन्ही टीम्सना एकसमान 1.74 कोटी रुपये मिळतील. भारताने ग्रुप स्टेजमध्ये 3 सामने जिंकले होते. यामुळे भारताला 43 लाख रुपये मिळतील. भारताच्या खात्यात इनामी रक्कमेपोटी एकूण 2.17 कोटी रुपये जमा होतील.**

विजेतेपदाच्या ट्रॉफीसह घसघशीत बक्षीस रक्कमही मिळाली आहे. ऑस्ट्रेलियन टीमने फायनलमध्ये यजमान दक्षिण आफ्रिकेला 19 धावांनी पराभूत केलं. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने आधीच महिला टी 20 वर्ल्ड कप 2023 साठी प्राइज मनीची घोषणा केली होती. या टुर्नामेंटमध्ये सहभागी झालेल्या सर्व 10 टीम्समध्ये एकूण 2.45 मिलियन डॉलर म्हणजे 20.31 कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कमेचे वाटप करण्यात आलं.

चॅम्पियनला टीम ऑस्ट्रेलियाला 1 मिलियन डॉलर म्हणजे 8.29 कोटी रुपये इनामी रक्कमेपोटी मिळाले. फायनलमध्ये हरलेल्या दक्षिण आफ्रिकेला 5 लाख डॉलर म्हणजे 4.14 कोटी रुपये मिळाले.

इतकंच नव्हे तर ग्रुप स्टेजमध्ये प्रत्येक मॅच जिंकणाऱ्या टीमला 17,500 डॉलर म्हणजे 14.51 लाख रुपये देण्यात आले. ऑस्ट्रेलियाने ग्रुप स्टेजमधील चारही सामने जिंकले.यासाठी त्यांना 1 मिलियन डॉलरशिवाय 70 हजार डॉलर म्हणजे 58 लाख रुपये इनामी रक्कमेपोटी मिळाले. म्हणजेच त्यांना एकूण 8.87 कोटी रुपये मिळाले.

# केन विल्यमसनने रॉस टेलरला मागे टाकत रचला इतिहास

## शतक झळकावत न्यूझीलंडचा सावरला डाव

। केन ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**न्यूझीलंड आणि इंग्लंड यांच्यात सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात केन विल्यमसनने न्यूझीलंड संघाला सालरण्याचे काम केले. फॉलोऑन खेळणाऱ्या न्यूझीलंड संघाचा डाव ४८३ धावांवर आटोपला. आता इंग्लंडला विजयासाठी २१० धावांची गरज आहे. माजी कर्णधार केन विल्यमसन न्यूझीलंडसाठी तारणहार ठरला, ज्याने आपल्या कसोटी कारकिर्दीतील २६ वे विक्रमी शतक झळकावले. त्याने २२६ चेंडूत ८ चौकारांच्या मदतीने आपले शतक पूर्ण केले.**

या शतकासह केन विल्यमसन न्यूझीलंडकडून कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणारा फलंदाज बनला आहे. केन विल्यमसनने



२८२ चेंडूचा सामना करताना १२ चौकारांच्या मदतीने १३२ धावा केल्या. त्याचबरोबर त्याने रॉस टेलरचा एक विक्रमही मोडला. केन विल्यमसनने आपल्या ९२व्या कसोटी सामन्यात हा पराक्रम केला. यापूर्वी हा विक्रम रॉस टेलरच्या नावावर होता, ज्याने ११२ सामन्यात ४४.६६ च्या सरासरीने ७६८३ धावा केल्या होत्या. केन विल्यमसनच्या नावार आता ७७८७ धावांची नोंद आहे. टेलरने दिल्या शुभेच्छा –

या कामगिरीबद्दल रॉस टेलरने केन विल्यमसनचे अभिनंदन केले आहे. त्याने ट्विट करून लिहिले, 'न्यूझीलंडकडून कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या केन विल्यमसनचे अभिनंदन. तुमची ही कामगिरी कसोटी क्रिकेटसाठी तुम्ही किती मेहनती आणि समर्पित आहात याची साक्ष आहे. अजून बरीच वर्षे पुढे बाकी आहेत.'

### न्यूझीलंडचे शानदार पुनरागमन

**इंग्लंड संघाच्या पहिल्या डावातील ४३५ धावांच्या प्रत्युत्तरात न्यूझीलंडचा पहिला डाव केवळ २०९ धावांतच संपुष्टात आला. त्यांना फॉलोऑन खेळावा लागला. हा सामना आपण सहज जिंकू असे इंग्लंडला नक्कीच वाटले असेल, पण दुसऱ्या डावात प्रथम डेव्हॉन कॉनवे (६१), टॉम ब्लंडेल (९०) आणि टॉम लॅथम (८३) आणि नंतर केन विल्यमसन (१३२) यांनी चांगली फलंदाजी करत न्यूझीलंडचे पुनरागमन केले.**

**बेन स्टोक्सने न्यूझीलंडला फॉलोऑन देऊन १० वर्षापूर्वीच्या जुन्या चुकीची पुनरावृत्ती केली आहे का?**

या मैदानावर न्यूझीलंड आणि इंग्लंड यांच्यातील शेवटचा सामना २०१३ मध्ये खेळला गेला होता, त्या वेळी तत्कालीन कर्णधार ॲलिस्टर कुकने न्यूझीलंडला फॉलोऑन दिला होता. पण यजमानांनी दुसऱ्या डावात शानदार फलंदाजी करत सामना अनिर्णित केला होता.

# गंगावेस तालमीच्या सिकंदरने चारली पंजाबच्या भारत केसरी गुरूप्रीतला पराभवाची धूळ

। पंजाब । महाईन्यूज ।
वृत्तसंस्था ।

प्रारंभी खडाखडी, नंतर ताकदीचा अंदाज घेत कोल्हापूरच्या गंगावेस तालमीच्या महान भारत केसरी पै. सिकंदर शेख याने पंजाबचा भारत केसरी पै. गुरुप्रीत सिंग याच्यावर एकचाक डावावर मात करीत हजारो कुस्ती शौकिनांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. विजेत्या शेखला कुस्तीप्रेमी ग्रुपतर्फे अडीच लाखांच्या पारितोषिकासह छत्रपती केसरीचा बहुमान प्रदान करण्यात आला.

ट्रबल शुटिंग सोशल वेलफेअर फौंडेशनतर्फे शिवजयंतीनिमित्त कृष्णाकाठावरील सरकारी घाट परिसरात ॲक्वे गार्डनर मालिकावीर ठरत सुमारे पाच तास हे मैदान रंगले. मैदानात लहानमोठ्या शंभर कुस्त्या झाल्या.

सिकंदरने गोपी पंजाबबरोबर खडाखडी करुन ताकदीचा अंदाज घेतला. पाठीवरून मागे येत काही क्षणातच आतून आकडी डाव टाकला. चपळतेने एकचाक डावाचा वापर करत अवघ्या दुसऱ्या मिनिटाला गोपीला चितपट केले.

दुसऱ्या क्रमांकाच्या कुस्तीत महाराष्ट्र केसरी बालारफिक शेख याने पै. भारत मदनेला धूळ चारली.

दुसऱ्या क्रमांकाच्या कुस्तीत महाराष्ट्र चिपळूण, ता. २६ केसरी बालारफिक शेख याने पै. भारत फुटलेल्या ४० आमदार मदनेला धूळ चारली.

